अस्सल सोलापुरी

सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. १७ मे २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २२७ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

लखनौचा मुंबईवर ५ धावांनी विजय

लखनऊ : अटीतटीच्या लढतीत लखनौने मुंबईचा पाच धावांनी पराभव केला. १७८ धावांचा पाठलाग करताना मुंबईला लखनौने १७२ धावांवर रोखले. लखनौने या विजयासह तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. ईशान किशन याचे वादळी अर्धशतक व्यर्थ गेले. लखनौच्या गोलंदाजांनी अचूक टप्प्यावर मारा केला. शिवाय फिल्डिंगही जबरदस्त केली. मोक्याच्या क्षणी निकोलस पूरन याने जबरदस्त झेल घेत सामना फिरवला. १७८ धावांचा पाठलाग करताना मुंबईने दमदार सुरुवात केली. ईशान किशन आणि कर्णधार रोहित शर्मा यांनी मुंबईला दमदार सलामी दिली. दोघांनी आक्रमक फलंदाजी करत डावाला आकार दिला. रोहित शर्मा आणि ईशान किशन यांनी पहिल्या विकेटसाठी ५८ चेंडूत ९० धावांची भागिदारी केली.

आयपीएल सामना क्र.६४

PUNJAB KINGS Vs DELHI CAPITALS

पंजाब विरुद्ध दिल्ली

वेळ : रात्री.७.३० वा. स्थळ : धर्मशाला

सरकारच्या भवितव्यावरुन रंगलीय 'जुगलबंदी'

जयंतराव म्हणतात, होय-गडगडणारच

अजितदादा म्हणाले, कोसळणार नाही

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षात त्या १६ आमदारांच्या अपात्रतेविषयी काय निर्णय होणार? याची राज्यभर उत्सुकता लागून आहे. कोर्टाच्या निर्णयातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सरकार वाचले आहे. मात्र, अपात्रतेच्या प्रकरणावरून शिंदे सरकारच्या भवितव्यावर राजकीय जुगलबंदी रंगू लागली आहे. हे आमदार अपात्र ठरले तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सरकार कोसळेल आणि राज्यात नवी समीकरणे उदयास येतील, असे भाकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी वर्तवले मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा विरोधी पक्ष नेते अजित पवार यांनी आमदार जरी अपात्र ठरले तरी शिंदे सरकार गडगडणार नाही, असा विश्वास व्यक्त केला आहे. वास्तविक पाहता एखाद्या पक्षातील प्रत्येक नेत्यांमध्ये समविचार असला पाहिजे पण पाटील व पवार या दोन ज्येष्ठ नेत्यांमधूनच विसंगत वक्तव्य समोर आल्याने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजूनही धुसपूस सुरू असल्याचे मानले जात आहे.

गेल्या आठवड्यात सुप्रीम कोर्टाने १६ आमदारांच्या अपात्रतेविषयावरचा निकाल जाहीर केला. कोर्टाने सरकारच्या आणि राज्यपालांच्या कारभारावर ताशेरे ओढले खरे परंतु एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचे सरकार कायम राहिले. दरम्यान, कोर्टाने आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभा अध्यक्षांकडे सोपवला. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आता यावर निर्णय घेतील. परंतु शिवसेनेच्या ठाकरे गटातील नेत्यांना विश्वास आहे की, हा निकाल ठाकरे गटाच्या बाजूने लागेल आणि शिंदे गटातील १६ आमदार अपात्र होतील. परंतु शिवसेनेच्या ठाकरे गटाचा मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मात्र वेगळे मत मांडल्याने त्यांच्या राजकीय भूमिकेविषयी अजूनही संभ्रमाचे वातावरण आहे.

या संदर्भात अजित पवार पत्रकारांशी बातचीत करताना म्हणाले की, आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात माझे स्वतःचे स्पष्ट मत आहे. २८८ पैकी यदाकदाचित त्या १६ आमदारांचा निकाल काही वेगळा (आमदार अपात्र ठरले) लागला. वेगळा निकाल लागणारच नाही म्हणा. पण समजा लागला तरी त्या निकालाचा सरकारच्या बहुमतावर कुठलाही परिणाम होणार नाही. दरम्यान, आता अजितदादांचे सहकारी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अजित पवारांच्या विसंगत मत व्यक्त केले आहे.जयंत पाटील म्हणाले, या १६ आमदारांमध्ये एक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील आहेत. मुख्यमंत्रीच जर अपात्र ठरले तर हे सरकार जाणार. कारण जेव्हा मुख्यमंत्री जातो, तेव्हा सरकारही जाते. राहिला प्रश्न बहुमताचा, तर २८८ पैकी १६ आमदार गेले तर बाकी शिवसेना सदस्य जे शिंदे गटात आहेत, त्यांचा विचार बदलू शकतो. ते कदाचित पुन्हा उद्धव ठाकरेंकडे जातील. मग सरकार बदलणार. मुख्यमंत्री अपात्र ठरले आणि त्यांचा राजीनामा आला तर नव्या सरकारच्या निर्मितीची प्रक्रिया सुरू होते. विधानसभेत ज्या पक्षाचे सर्वात जास्त सदस्य आहेत त्यांना राज्यपाल सत्तास्थापनेचे आमंत्रण देऊ शकतात. त्यांनी बहुमत सिद्ध केले तर त्यांचे सरकार बनेल. पण बहुमत सिद्ध करू शकले नाहीत तर सत्ताबदल होऊ शकतो.

नार्वेकरांचा सवाल... : अपात्रतेविषयीचा निर्णय लवकर घेण्याची मागणी विरोधकांनी लावून धरली आहे.त्यावर बोलतना सभापती राहुल नार्वेकर म्हणाले की- सर्वोच्च न्यायालयाने निकाल द्यायला १० महिने घेतले मी निर्णय दोन महिन्यांत कसा देणार? विधानसभेच्या बाहेर नियमबाह्य, घटनाबाह्य वक्तव्यांकडे मी लक्ष देत नाही आणि अशा वक्तव्यांना काडीची किंमतही देत नाही

पोपट मेला आहे... : शिंदे गटाचे १६ आमदार अपात्र होणार नाहीत, या अजित पवारांच्या विधानाबाबत विचारले असता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी यावर काहीही बोलू शकत नाही. हे प्रकरण विधानसभा अध्यक्षांकडे आहे. याबाबत जो काही निर्णय द्यायचा आहे, तो निर्णय ते देतील. पण एक अभ्यासक, एक वकील आणि २५ वर्षे विधानसभेत कार्य केलेली व्यक्ती म्हणून मला असे वाटते की, आता उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीला पुरते समजले आहे की, पोपट मेला आहे. तरीदेखील तो मान हलवत नाही. तो हातपाय हलवत नाहीये, अशाप्रकारच्या गोष्टी ते बोलतायेत. अशा गोष्टी बोलणे त्यांना सहाजिकच आहे. कारण त्यांना त्यांच्या कार्यकर्त्यांना दाखवावे लागते की, आशा जिवंत आहेत.

बार्शीतील पोलीस हवालदाराला ४० हजारांची लाच घेताना रंगेहाथ अटक

सुराज्य/बार्शी

एका गुन्ह्यामध्ये तक्रारदार व त्यांचे नातेवाईक यांना अटक करून तात्काळ जामिनावर सोडण्याकरिता व सदर गुन्ह्यामध्ये मदत करण्याकरिता ५० हजार रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ४० हजार रुपये लाच रक्कम स्वीकारताना बार्शी तालुका पोलीस ठाण्यातील हवालदार हर्षवर्धन हरिश्चंद्र वाघमोडे यास रंगेहाथ पकडण्यात आले.

याबाबत भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तक्रारदार व त्यांचे नातेवाईक यांचेवर बार्शी तालुका पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यामध्ये तक्रारदार व त्यांचे नातेवाईक यांना अटक करून तात्काळ जामिनावर सोडणेकरिता व सदर गुन्ह्यामध्ये मदत करणेकरिता ५० हजार रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ४० हजार रुपये लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळा कारवाईमध्ये वाघमोडे रंगेहाथ सापडला.

संशयित आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे. लाप्रविचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार, लाप्रवि सोलापूरचे पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक, पोलीस अंमलदार स्वामीराव जाधव, अतुल घाडगे, राजू पवार, रशिद शेख यांनी ही कारवाई केली.

विवाहित महिलेचा पाण्यात बुडून मृत्यू

सुराज्य/मंगळवेढा

शेतातील विहिरीवर मोटर चालू करण्यास गेलेल्या २५ वर्षीय विवाहित महिला पाण्यात पडून बुडून मृत पावल्याची घटना घडली असून वर्षा हरी सरगर असे मयत विवाहितेचे नाव आहे.

मयत वर्षा हरी सरगर ही दि.१३ रोजी सकाळी ६ वा. चोखामेळानगर हद्दीतील सरगर वस्ती येथे जमीन गट नं.६२० मधील विहिरीवरील मोटर चालू करण्यास गेली असता ती पाण्यात पडून बुडून मयत झाली. सकाळी ६वा. मोटर चालू करण्यास गेलेली भावजय ११ वाजेपर्यंत परत न आल्याने तिचा सर्वत्र शोध घेतला परंतु ती मिळून आली नाही.गावातील नागरिक शोध घेत असताना विहिरीजवळ गेल्यावर मयताच्या पायातील चप्पल काठावर दिसली.त्यावरून विहिरीत पडली असावी अशी शंका व्यक्त करीत मोटारीने विहिरीतील पाण्याचा उपसा केला असता मयत वर्षा ही पाण्यात बुडल्याचे दिसून आले.

महिलेचे साडेसहा तोळ्याचे दागिने पळविणाऱ्या तीन महिलांना अटक

शहर गुन्हे शाखेची कामगिरी

सुराज्य/सोलापूर

शहर गुन्हे शाखेने येथील एसटी बसस्थानकावर महिलेचे साडेसहा तोळ्याचे सोन्याचे दागिने पळविणाऱ्या तीन महिलांना अटक केली असून चोरलेले सर्व दागिने जप्त करण्यात आले आहेत.

शाहीरा दिलीप सकट ऊर्फ पाटील (वय ५८), सोनम ऊर्फ सुमेधा मंजुनाथ कांबळे (वय ३०), सरिता काशिनाथ ऊर्फ खासीम उपाध्ये (वय ३२, तिघी रा.विठ्ठल मंदिर जवळ, बापूनगर, कलबुर्गी, कर्नाटक) अशी अटक करण्यात आलेल्या तिघींची नावे आहेत. ११ मे रोजी दुपारी १२.३० वाजता सुस्मिता ऋषिकेश पाटील (रा. वायोली, ता. मोहोळ) या सासरी वायोली येथे जाण्याकरिता सोलापूर एस टी स्टॅन्ड येथे आल्या होत्या. त्या एस.टी. बसमध्ये चढत असताना, गर्दीचा फायदा घेऊन, तीन अनोळखी महिलांनी पाटील यांच्या पर्समध्ये ठेवलेले चार तोळ्याचे सोन्याचे गंठण व अडीच तोळ्याचे नेकलेस असे साडेसहा तोळे सोन्याचे दागिने चोरले होते. याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.

शहर गुन्हे शाखेच्या पथकाने एस.टी. स्टँड व परिसरात असलेल्या सुमारे ४० सी सी टी व्ही कॅमेऱ्याची पाहणी केली असता, त्यामध्ये तीन संशयित महिला ह्या फिर्यादीच्या पर्स मधील दागिने चोरी करताना अस्पष्टरित्या दिसत होत्या. त्यावरून पथकाने संशयित महिलांचा शोध घेत असताना त्यांना माहिती मिळाली की, या तीन महिला या कलबुर्गी येथील आहेत. त्यानुसार पथकाने तेथे जाऊन दोन दिवस तपास करून त्या महिलांना बापूनगर, कलबुर्गी, येथून ताब्यात घेतले. त्यांच्याकडे कौशल्यपूर्वक तपास केला असता, त्यांनी ही चोरी केल्याचे कबूल करून, पाटील यांचे चोरी केलेले सोन्याचे गंठण व नेकलेस असे साडेसहा तोळे सोन्याचे दागिने काढून दिले. ही कारवाई पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने, पोलीस उपायुक्त डॉ. दीपाली काळे, सहायक आयुक्त प्रांजली सोनवणे, पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक संजय क्षीरसागर, कृष्णात कोळी, महेश शिंदे, राजू मुदगल, कुमार शेळके, निलोफर तांबोळी, रत्ना सोनवणे, ज्योती लंगोटे, सुमित्रा बारबोले, सिद्धार्थ देशमुख, प्रकाश गायकवाड, वसीम शेख, बाळु काळे यांनी केली.

सर्व्हेक्षणाबरोबरच मिळकत कराची बिले वाटपही सुरू

सुराज्य/सोलापूर

महापालिकेच्या वतीने मिळकती सर्वंकष सर्व्हे क्षणाबरोबरच घरोघरी त्याच कर्मचाऱ्यांकडून मिळकत कराची बिले वाटपाचे कामही सुरू करण्यात आले आहे.

सोलापूर शहरात सुमारे २ लाख ५० हजार मिळकती आहेत. सर्व्हेबरोबर घरोघरी मिळकत कराची बिले वाटपाचे काम कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येत आहे. सर्व पेठनिहाय मिळकत कराची ही बिले वाटप करण्यात येत आहेत. शहरात एकूण ५० पेठ आहेत. साधारणतः ४१ पेठांची बिले तयार झाले असून ती वाटप करण्यात येत आहेत. गवसुची बिले आल्यानंतर लवकरच वाटप करण्यात येणार आहेत. मिळकतदारांनी आपला कर भरावे, असे आवाहन मिळकतकर विभाग प्रमुख युवराज गाडेकर यांनी केले आहे.

शिंदेंना मर्सिडीजमध्ये बसून प्रतिक्रिया देणे शोभत नाही

ढोंबळेंची बोचरी टीका

सुराज्य/सोलापूर

चार वर्षानंतर शिंदे साहेबांना सोलापूरचा पाणी प्रश्न आणि विमान तळाचा विषय आठवतोय आणि हेच नेते आता देश गरिबांचा आहे म्हणून सांगतात त्यांना मर्सिडीज मध्ये बसून ही प्रतिक्रिया देणे शोभत नाही अशा भाषेत माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांनी सुशीलकुमार शिंदे यांच्यावर बोचरी टीका केली. यावरून आता काँग्रेसचे नेते आणि ढोबळे यांच्यात शाब्दिक वॉर पेटण्याची शक्यता आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे हे पुन्हा राजकारणात सक्रिय झाल्याचे चित्र आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांचे सोलापूर जिल्ह्यात दौरे वाढले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसने सोलापूर लोकसभा मतदारसंघ आपल्याकडे केलेल्या मागणीनंतर शिंदे आणखीच सक्रिय झाल्याचे चित्र पाहायला मिळते. याच पार्श्वभूमीवर कर्नाटक राज्यातील सत्ता स्थापनेसाठी सुशीलकुमार शिंदे यांची निरीक्षक म्हणून निवड झाली आहे. कर्नाटक विजयानंतर त्यांनी प्रतिक्रिया देताना हा देश गोरगरिबांचा असल्याचे सांगत भाजपवर टीका केली होती.

दरम्यान सोमवारी भाजपचे ज्येष्ठ नेते लक्ष्मणराव ढोबळे हे जिल्हाधिकारी कार्यालयात आले असता पत्रकारांनी याबाबत विचारले असता त्यांनी सुशीलकुमार शिंदे यांच्यावर टीका केली. शिंदे मर्सिडीज मध्ये बसून फिरतात आणि देश गरिबांचा आहे म्हणतात हे त्यांना शोभत नसल्याचे ढोबळे यांनी सांगितले. यावर शिंदे किंवा काँग्रेसचे नेते काय प्रतिक्रिया देतात हे पाहणे औत्सुक्याचे राहणार आहे.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

स्वतःच्या पगारीची सोय की संपलं !

कल्याण
399-15-357

मेन बाजार
236-15-230

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या अध्यक्षपदी प्रशांत दामले

सुराज्य/सोलापूर

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत प्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले यांची विजयी झाले आहेत. या निवडणुकीत प्रशांत दामले यांना ५० मते आणि प्रसाद ऊर्फ नवनाथ कांबळी यांना ९ मते मिळाली. ५ वर्षांसाठी ही निवड झाली आहे.



या नाट्य परिषदेच्या नियामक मंडळात सोलापूरच्या दिलीप कोरके आणि विजयकुमार साळुंखे या दोघांचा समावेश आहे. प्रशासन उपाध्यक्षपदी नरेश गडेकर यांना ४८ मते, कोषाध्यक्षपदी सतीश लोटके यांना ५१ मते, प्रमुख कार्यवाहपदी अजित भुरे यांची ५० मतांनी निवड झाली. अखिल भारतीय मराठी परिषदेच्या या पंचवार्षिक निवडणुकीत दामले यांच्या रंगकर्मी नाटक समूह' गटानं विजय मिळवला होता.

सोलापूरचे कोरके आणि विजय साळुंखे यांची निवड

नवीन कार्यकारी समिती २०२३-२८ साठी याप्रमाणे आहे : अध्यक्ष प्रशांत दामले, उपाध्यक्ष (प्रशासन) नरेश गडेकर, उपाध्यक्ष (उपक्रम) भाऊसाहेब भोईर, कोषाध्यक्ष सतीश लोटके, प्रमुख कार्यवाह अजित भुरे, सहकार्यवाह समीर इंदुलकर, सहकार्यवाह दिलीप कोरके, सहकार्यवाह - सुनील ढगे, कार्यकारी सदस्य पदासाठी ठाणे विजय चौघुले, मुंबई सविता मालपेकर, मुंबई सुशांत शेलार, मुंबई उपनगर संजय देसाई, पुणे दिपक रेगे, सोलापूर विजयकुमार साळुंके, बीड दिपा क्षिरसागर, कोल्हापूर - गिरीश महाजन, नागपूर संजय रहाटे, सांगली - संदीप पाटील,उस्मानाबाद- विशाल शिंगाडे यांचे हे सर्वांना मते निवड झाली आहे

सध्याचं सरकार सहकार्य करणारं - दामले : निवडीनंतर प्रशांत दामले यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सध्याची नाट्यगृहांची अवस्था, नाटक व्यवसाय यामध्ये नक्कीच सकारात्मक बदल होतील असं प्रशांत दामले यांनी म्हटलं आहे. त्याचप्रमाणे याआधी काय झालं ते उगाळत न बसता नव्या जोमाने कामाला लागणार आहोत असंही प्रशांत दामलेंनी म्हटलं आहे. महाराष्ट्रातल्या सरकारचंही प्रशांत दामलेंनी कौतुक केलंय. आता मंत्री उदय सामंत हे आमचे ट्रस्टी आहेत. तसंच शरद पवार हे देखील आमचे ट्रस्टी आहेत. ते आम्हाला चांगल्या कामात मदत करतील याचा मला विश्वास वाटतो, असे दामले यांनी म्हटलं आहे.

आंतरराष्ट्रीय खेळाडू ईशा वाघमोडेला थेट रेल्वेत नोकरी

सोलापूर : सोलापूरची आंतरराष्ट्रीय खेळाडून ईशा वाघमोडे हिला रेल्वेत तिकीट निरीक्षक या पदावर थेट नोकरी मिळाली असून कुठलीही परीक्षा वा मुलाखत न घेता तिला नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. खेळाडून या कोट्यातून रेल्वेत तिकीट निरीक्षक म्हणून नोकरी मिळावी, म्हणून ईशा वाघमोडे हिने वर्षापूर्वी अर्ज केला होता. तिने कनिष्ट गट आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये दोन सुवर्णपदक पटकावली आहेत.

सहा कनिष्ठ गट राष्ट्रीय स्पर्धेत आठ सुवर्ण, पान रौप्य पदक, चार कासत्रय पदके मिळविली आहेत. तीन वरिष्ठ गट राष्ट्रीय स्पर्धेत तीन पदके मिळविली आहेत. तिला प्रशिक्षक मनिष भावसार यांनी मार्गदर्शन केले. रेल्वेत थेट नोकरी मिळाल्याने तिचे कौतुक होत आहे.